सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
पूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
POSTAL REG NO. SLP/32/2015-2017
रविवार, दि. २४ डिसेंबर २०१७ । युगाब्द ५११९ । शिवशक ३४४ । पाने ८+८(आसमंतसह) । किंमत ४ रुपये । वर्ष २ रे अंक ११८

भोसले
विद्यालय
कोरेगाव

## चीन, पाकिस्तानला रोखण्यासाठी भारत सक्षम : ब्रिगेडियर सुनील बोधे



**कोरेगाव, २३ डिसेंबर**

चीन आणि पाकिस्तान हे भारताचे पारंपरीक शत्रू आहेत. पाकिस्तान भारतावर वारंवार छुपे हल्ले करीत असून चीन भारतीय अर्थ व्यवस्था खिळखिळी करण्याच्या प्रयत्नात सातत्याने व्यस्त आहे. चीनने संगणक व तंत्रज्ञानात केलेली प्रगती ही भारतापुढील आव्हान आहे. चीन व पाकिस्तान यांनी भारताच्या विकासासमोर ऊभे केलेले आव्हान मोडून काढण्यासाठी भारत सक्षम आहे, असे प्रतिपादन ब्रिगेडीयर सुनील बोधे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे डी. पी. भोसले कॉलेज व विजय दिन समारोह समिती कोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विजय दिन समारंभ २०१७' या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील हे होते. सुनील बोधे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना संरक्षण क्षेत्रात करिअरच्या मुबलक संधी उपलब्ध आहेत. पोलीस दल, सीमा सुरक्षा दल, आर्मी, नेव्ही, वायुसेना या क्षेत्रात करिअर करता येते. संरक्षण क्षेत्रातील नोकरीसाठी विद्यार्थ्यांनी व्यायाम व अभ्यास या दोन्ही गोष्टी केल्या पाहिजेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले. या कार्यक्रमात शहिद जवान गणेश कृष्णा ढवळे, शहिद जवान दीपक जगन्नाथ घाडगे, शहिद जवान रवींद्र बबन धनावडे, शहिद जवान सुभाष लाला करांडे यांच्या प्रतिमांना पुष्पचक्र अर्पण करण्यात आले तसेच त्यांच्या वीरपत्नी, वीरमाता, कुटुंबीयांचा व दुसऱ्या महायुध्दातील सहभागी सेनानी पांडुरंग जाधव व दत्तु कासार यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात शिवतेज प्राथमिक विद्यालय आरे - मल्लखांब प्रात्यक्षिक, चॅलेंज अकॅडमी कोरेगाव - बँड डिस्प्ले, चॅपियन्स कराटे सातारा - सेल्फ डिफेन्स, डी. पी. भोसले कॉलेज - धनुर्विद्या-तायक्वान्दो- जोगवा, सरस्वती इंग्लिश मिडियम स्कूल, कोरेगाव - अरेबिक्स, अश्ववंदना शहिद श्रध्दांजली, सिव्हिल बँड शिरढोण यांनी प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यक्रमात कर्नल राजेंद्र जाधव, कॅप्टन महादेव भोसले यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. विद्या नावडकर, प्रा. भीमराव मदने व प्रा. संगीता वीरकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. कर्नल विष्णूपंत चव्हाण, लेफ्टनंट प्रा. बाळकृष्ण भोसले, आजी-माजी सैनिक संघटना कोरेगाव, नगरपंचायत कोरेगाव, नगर विकास कृती समिती, एस एज्युकेशन सोर्सेस सेंटर, जाणिव मित्र समूह, सोनेरी ग्रुप, गुरुदत्त अकॅडमी, २२ महाराष्ट्र बटॅलियन एन.सी.सी. सातारा, संस्कृती मित्रमंडळ कोरेगाव आदींचे सहकार्य लाभले.

तभा प्रतिनिधी